* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
# आत्ताच एक्सप्रेस
* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २७५ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * शुक्रवार दि.०६ फेब्रुवारी २०२६ | * पाने-४

## आपला देश तरुणांचा देश म्हणून उदयास येतो आहे-पंतप्रधान मोदी

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** – २१ व्या शतकाचं पहिली २५ वर्षे संपली आहेत. आता २०२६ मध्ये आपण आहोत. १०० वर्षांपूर्वी म्हणजेच १९२५ नंतर भारत स्वतंत्र झाला पाहिजे ही मोहीम जोरदार ठरली होती. आता २०२६ मध्ये आपण विकासाच्या दिशेने वाटचाल करत होतो. राष्ट्राच्या प्रत्येक व्यक्तीला हे वाटतं आहे की आपण एका अशा वळणावर आलो आहोत की ज्याला वाटतं आहे की आपल्याला पुढे जायचं आहे मागे वळून बघायचं नाही असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत म्हटलं आहे. दरम्यान विरोधक यावेळी सातत्याने मनमानी चालू देणार नाही, हुकूमशाही बंद करा, राहुल गांधींना बोलू द्या म्हणत घोषणाबाजी करत होते. तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषण सुरु ठेवलं. आपल्याला आता थांबून चालणार नाही असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे.



जगातले समृद्ध देश आता म्हातारे होत चालले आहेत. आपला देश तरुणांचा देश म्हणून उदयास येतो आहे. हा एक उत्तम योग आहे. दुसऱ्या बाजूला आपण पाहतो आहोत की जगाला भारताचं आकर्षण होतं आणि आता ते वाढतं आहे. भारताच्या बुद्धिमत्तेचं आकर्षण सगळ्या जगाला आहे. कारण आपल्याकडे युवकांची कल्पकता आहे. आपल्या देशातील तरुणांकडे संकल्प आहे आणि सामर्थ्यही आहे. भारत आज जगात जी आव्हानं निर्माण होत आहेत त्यांचं उत्तर देणारा देश म्हणून उभा राहतो आहे. आशेचा किरण म्हणजे आपला देश ठरतो आहे हा देखील एक सुयोग आहे असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राज्यसभेत म्हटलं आहे. देशाची प्रगती आपण वेगाने करतो आहोत.

आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा अर्थव्यवस्थेच्या बाबतीत सहाव्या क्रमांकावर होता. काँग्रेसच्या कार्यकाळात तो ११ व्या क्रमांकावर गेला. आता आमच्या कार्यकाळात आपल्या देशाच्या अर्थ व्यवस्थेची वाटचाल तिसऱ्या क्रमांकावर होते आहे. कोव्हिडनंतर जगात बरीच उलथापालथ झाली. पण जग अजूनही सावरु शकलेलं नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर एक वर्ल्ड ऑर्डर तयार झाली होती आता एक नवी वर्ल्ड ऑर्डर तयार होते आहे. या सगळ्या घटनांकडे निष्पक्ष पद्धतीने पाहिलं तर लक्षात येतं की झुकतं माप हे भारताकडे आहे. भारत विश्वमित्र म्हणून उदयास आला आहे. विश्व कल्याणाच्या दृष्टीने आपण आपली भूमिका बजावतो आहोत. आपण नऊ देशांशी विविध करार केले आहेत, जे लोक थकले आहेत आणि निघून गेले आहेत पण त्यांना कधी ना कधी तरी उत्तर द्यावं लागेल. त्यांनी देशाची अशी अवस्था का करुन ठेवली होती की जगातला एकही देश भारताकडे बघतही नव्हता असा टोला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घोषणाबाजी करणाऱ्या काँग्रेसला लगावला. तसंच भारत हा आता सक्षम देश झाला आहे. भारत जगाशी स्पर्धा करु शकतो यात काहीही शंका नाही असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेतल्या भाषणात म्हटलं आहे.

''ज्यांनी आदिवासी महिला राष्ट्रपतींचा आणि संविधानाचा वारंवार अपमान केला, त्यांना संविधान हा शब्द उच्चारण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही,'' अशा शब्दांत पंतप्रधानांनी विरोधकांना सुनावले. लोकसभेत काल झालेल्या गदारोळाचा आणि कागद भिरकावण्याच्या घटनेचा संदर्भ देत त्यांनी काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर तीव्र टीका केली.

काल लोकसभेत एक अतिशय वेदनादायक घटना घडली. सभागृहात असे वातावरण निर्माण झाले. सभापतींवर कागदपत्रे फेकण्यात आली. त्यावेळी आसामचा एक सदस्य सभापती होता. हा आसामचा अपमान नाही का? काल पुन्हा कागदपत्रे फेकण्यात आली, त्यावेळी आंध्र प्रदेशचा एक दलित सदस्य सभापती होता. जेव्हा भूपेन हजारिका यांना भारतरत्न देण्यात आला तेव्हा त्यांनी त्याचाही निषेध केला. हा आसामचा आणि देशभरातील कलाप्रेमींचा निषेध आहे. आसाम हे विसरणार नाही, असे मोदी म्हणाले.

## संसदेत पंतप्रधान मोदींवर हल्ल्याचा प्रयत्न?:आम्ही बॅनर घेऊन गेलो होतो, हत्यार नाही; भाजपच्या आरोपांवर वर्षा गायकवाडांचा पलटवार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/नवी दिल्ली** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर संसदेत विरोधकांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला असल्याचा दावा भाजपकडून केला जात आहे. बुधवारी संध्याकाळी ५ वाजता जेव्हा सभागृहाचे कामकाज सुरू झाले, तेव्हा विरोधी पक्षाच्या महिला खासदारांनी सत्ताधारी नेत्यांच्या खुर्च्यांना घेराव घातला. यामध्ये पंतप्रधान मोदींच्या खुर्चीचाही समावेश होता. महिला खासदारांच्या हातात मोठे बॅनर होते, ज्यावर लिहिले होते – जे योग्य आहे, ते करा. यावेळी मोदी त्यांच्या खुर्चीवर नव्हते. परंतु, या झालेल्या गोंधळामुळे अध्यक्षांनी कामकाज तहकूब केलए होते. मंगलबवारी झालेल्या गोंधळानंतर ८ विरोधी खासदारांच्या निलंबनाच्या निषेधार्थ आज पुन्हा गोंधळ झाला होता. परंतु, यावरून थेट पंतप्रधानांवर हल्ला करण्याचा विरोधकांचा डाव असल्याचा दावा भाजपकडून करण्यात आला आहे.

काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी संसदेत झालेल्या गोंधळावर प्रतिक्रिया दिली आहे. त्या म्हणाल्या, आमची अपेक्षा आहे की अध्यक्षांनी निष्पक्षपणे काम करत आम्हाला न्याय द्यावा. विरोधी पक्षातले आहेत, त्यांना बोलू द्यायचे नाही. सत्ताधारी पक्षातले जे आहेत ते अश्लील बोलतात तरी त्यांना बोलू द्यायचे, ही भूमिका योग्य नाही. निशिकांत दुबे यांनी महिलांचा अपमान केला आहे आणि अश्लील बोलले आहेत.

जेव्हा विरोधी महिला खासदार पंतप्रधान मोदींच्या खुर्चीजवळ गेले तेव्हा निशिकांत दुबे होते का? असा प्रश्न विचारला असता वर्षा गायकवाड यांनी हो म्हटले. पुढे त्या म्हणाल्या, आम्ही जिथे कुठे बसलो आहोत, त्याचा अधिकार आम्हाला संविधानाने दिला आहे. लोकशाहीने दिलेल्या अधिकारांचा आम्ही वापर करू शकतो, संवैधानिक हत्याराचा आम्ही वापर करू शकतो. आम्ही बॅनर घेऊन उभे होतो. बॅनर घेऊन उभे होतो तर यायचे होते, आम्ही काय हत्यार घेऊन उभे होतो का मारायला? असा सवाल गायकवाड यांनी उपस्थित केला.

भाजपच्या नेत्यांनी दावा केला की हातात काचेच्या बांगड्या होत्या, हत्यार म्हणून वापरण्यासाठी. त्यावर वर्षा गायकवाड म्हणाल्या, हातात बांगड्याच नाहीत, लग्नापासून घातल्या नाहीत. मला एक सांगा, ज्या महिला काचेच्या बांगड्या घालतात, त्यांचा मी सन्मान करते. महिला हातात बांगड्या घालतात, पण त्या बांगड्यांचा अर्थ असा होत नाही की ते मारण्यासाठी घालतात. ते त्यांचं सौभाग्याचे लेणं म्हणून घालतात.

## पहिल्यांदाच नगरसेवक बनलेल्या जयश्री सोनकांबळे लातूरच्या महापौर

**आत्ताच एक्सप्रेस**

**लातूर** – महापालिका निवडणुकीत काँग्रेसने राज्यातील एकमेव महापालिक स्पष्ट बहुमतासह ताब्यात घेतली ती लातूरची. येथील महानगरपालिकेचया महापौरपदी जयश्री सोनकांबळे आणि उपमहापौरपदी ॲड. स्नेहल उटगे यांच्या नावावर अखेर अधिकृत शिक्कामोर्तब झाले आहे. दोन्ही पदांसाठी अन्य कोणतेही दावेदार नसल्याने या निवडी बिनविरोध ठरल्या असून,लवकरच हे दोघेही आपल्या पदाची सूत्रे हाती घेणार आहेत. विशेष म्हणजे, यंदा प्रथमच नगरसेवक बनलेल्या जयश्री सोनकांबळेंना थेट महापौरपदाची लॉटरी लागली असून स्नेहल उटगे हेही पहिल्यांदाच नगरसेवक बनले आहेत. त्यात, जयश्री सोनकांबळे ह्या सर्वसामान्य कुटुंबातील भगिनीला काँग्रेसने महापौरपदाची संधी दिल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. जयश्री यांचे पती खासगी नोकरी करतात, गेल्या २० ते २५ वर्षांपासून ते काँग्रेसचे कार्यकर्ता बनून कार्यरत आहेत.



लातूर महानगरपालिकेच्या महापौरपदी जयश्री सोनकांबळे यांची निवड झाली असून, त्यांनी भाजपाच्या उमेदवार प्रियंका गायकवाड यांचा १५३ मतांनी पराभव करत विजय मिळवला आहे. या विजयासह लातूरच्या महापौरपदावर त्यांचे नाव कोरले गेले आहे. प्रभाग क्रमांक १२ मधून अनुसूचित जाती (एस.सी.) महिला गटातून त्यांनी निवडणूक लढवली होती. वय ४६ वर्षे असलेल्या जयश्री सोनकांबळे यांचे शिक्षण बारावीपर्यंत झाले आहे. त्या मागील १५ वर्षांपासून काँग्रेस पक्षात सक्रिय असून, सामाजिक कार्य आणि पक्ष संघटनात्मक कामातून त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या निवडणुकीत पहिल्यांदाच काँग्रेस पक्षाने त्यांना उमेदवारी दिली, आणि पहिल्याच निवडणुकीत थेट विजय मिळवत त्या महापौरपदी विराजमान झाल्या आहेत. पहिल्याच प्रयत्नात मिळालेल्या या यशामुळे त्यांचे राजकीय पदार्पण विशेष लक्षवेधी ठरले आहे. त्यांचे पती भालचंद्र सोनकांबळे हे खासगी नोकरीत कार्यरत असून, तेही मागील २० ते २५ वर्षांपासून काँग्रेस पक्षाशी निष्ठावानपणे जोडलेले आहेत.

कुटुंबाची सामाजिक व राजकीय पार्श्वभूमीही त्यांच्या वाटचालीला बळ देणारी ठरली आहे. सामान्य कुटुंबातून पुढे येत महापौरपदापर्यंतचा जयश्री सोनकांबळे यांचा प्रवास अनेक महिलांसाठी प्रेरणादायी मानला जात आहे. सामाजिक बांधिलकी, पक्षनिष्ठा आणि सातत्यपूर्ण कार्याच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले आहे.

## उत्तर भारतीय तमिळनाडूमध्ये पाणीपुरी विक्रीसाठी येतात

### तमिळनाडूचे कृषी मंत्री एमआरके पनीरसेल्वम यांच्या विधानामुळे वाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** – त्रिभाषा धोरणावरुन महाराष्ट्रात जोरदार वाद झाल्यानंतर, दक्षिणेत देखील या धोरणाविरोधात भूमिका मांडली जात आहे. तमिळनाडूचे कृषी मंत्री एमआरके पनीरसेल्वम यांनी उत्तर भारतीयांबाबत केलेल्या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. कृषी मंत्री पनीरसेल्वम यांनी उत्तर भारतीयांची तुलना हलक्या कामांसोबत करत नवा वाद ओढून घेतला आहे. पनीरसेल्वम यांच्या वक्तव्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी हिंदी विरुद्ध प्रादेशिक भाषा वाद पुन्हा उफाळून आला आहे.

मंत्री पनीरसेल्वम एका सार्वजनिक कार्यक्रमात बोलत होते, त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केले. उत्तरेकडील लोकांनी 'फक्त हिंदी शिकले आहे', त्यांच्यासाठी तमिळनाडूमध्ये नोकरीच्या संधी मर्यादित आहेत. अनेकदा त्यांना कमी पगाराच्या नोकऱ्या कराव्या लागतात. दुसरीकडे तमिळनाडूमधील विद्यार्थ्यांना तमिळ आणि इंग्रजी शिकल्यामुळे फायदा होतो, असा दावा पनीरसेल्वम यांनी केला आहे.

''उत्तर भारतीय तमिळनाडूमध्ये फक्त टेबले साफ करण्यासाठी येत आहेत, ते बांधकाम मजूर, पाणीपुरी विक्रेते म्हणून काम करण्यासाठी येतात. याचं कारण ते फक्त हिंदी शिकले आहेत. याउलट आमची मुलं परदेशात गेली आहेत, कारण आम्ही द्विभाषिक धोरण स्वीकारले आहे. तमिळसह येथील मुलं इंग्रजीही चांगले शिकले. आता अमेरिका, लंडनमध्ये जाऊन कोट्यवधी रुपये कमवत आहेत,'' असे पनीरसेल्वम म्हणाले.

मंत्री पनीरसेल्वम यांच्या वक्तव्यामुळे त्यांच्यावर विविध स्तरातून टीका होत आहे. कृषीमंत्र्यांचे विधान असंवेदनशील आणि फूट पाडणारे असल्याची टीका त्याच्यावर करण्यात आली आहे. दरम्यान, 'पक्षाचा हिंदी भाषिक किंवा उत्तर भारतीय करत असलेल्या नोकऱ्यांना कोणताही विरोध नाही', असे म्हणत सत्ताधारी द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचे प्रवक्ते डॉ. सय्यद हफीजुल्ला यांनी पनीरसेल्वम यांची बाजु सावरण्याचा प्रयत्न केला.

''द्विभाषिक धोरणामुळे तामिळनाडू आणि येथील लोकांना फायदा झाला. इंग्रजीला प्राधान्य नसल्यामुळे, हिंदी भाषिक राज्यांतील लोक शिक्षणात प्रगती करू शकलेले नाहीत,'' असे डॉ. सय्यद हफीजुल्ला म्हणाले. पनीरसेल्वम यांच्या वक्तव्यावर इतर पक्षातील नेत्यांनी देखील तीव्र नाराजी व्यक्त करत प्रतिक्रिया दिल्या आहेत. 'तमिळनाडूची अर्थव्यवस्था इतर राज्यांतील स्थलांतरित मजुरांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे', असे काँग्रेसचे खासदार कार्ती चिदंबरम म्हणाले.

## काँग्रेस पक्ष अबोध बालकाचा बंधक करू नका; नड्डांच्या टीकेवर खर्गेंचा संताप

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** – सध्या संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून वेगवेगळ्या मुद्यांवरून हे अधिवेशन चांगलंच गाजत आहे. विविध प्रश्नांवरून विरोधक सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करत आहेत, तर विरोधकांच्या आरोपाला सत्ताधारी उत्तर देत आहेत. मात्र, या अर्थसंकल्पीय अधिवेशना दरम्यान लोकसभेत विरोधी पक्षांच्या सदस्यांनी एकत्रितपणे केलेली घोषणाबाजी, निदर्शने आणि फलकबाजीमुळे निर्माण झालेल्या गदारोळामुळे बुधवारी पंतप्रधान मोदी यांना राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या चर्चेवरील उत्तराचं भाषण करता आलं नाही.

पंतप्रधान मोदी यांच्या भाषणाविना सभागृहाचं कामकाज बुधवारी संध्याकाळी पाचनंतर तहकूब करण्यात आलं. तसेच राहुल गांधी यांना त्यांच्या भाषणावेळी काही मुद्यांवर लोकसभेच्या अध्यक्षांनी बोलू न दिल्याचा आरोप करत आज काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी राज्यसभेत सवाल उपस्थित केले. 'राहुल गांधी यांच्या बोलण्याने सरकार का त्रस्त आहे?' असे अनेक सवाल मल्लिकार्जुन खरगे यांनी विचारले.

मल्लिकार्जुन खरगे यांच्या या सवालानंतर केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू आणि निर्मला सीतारमण यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. 'काँग्रेस पक्ष अबोध बालकाचा बंधक करू नका', अशी टीका नड्डा यांनी केली. त्यांच्या या टीकेनंतर खर्गेनी संताप व्यक्त करत जोरदार निशाणा साधला. तसेच लोकसभेत पंतप्रधान मोदींचं उत्तराचं भाषण रखडल्याने राज्यसभेतही मोठ्या प्रमाणात गदारोळ झाला आणि विविध मुद्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप–प्रत्यारोपावरून जोरदार खडाजंगी झाली.

आज राज्यसभेत बोलताना मल्लिकार्जुन खरगे यांनी सरकारला अनेक प्रश्न विचारले. खरगे म्हणाले की, ''राहुल गांधी यांच्या बोलण्याने सरकार का त्रस्त आहे? केंद्र सरकार नेमकं काय लपवू पाहत आहे? लोकसभेत राहुल गांधी यांना का बोलू दिलं जात नाही?'', असे प्रश्न खरगे यांनी विचारले. तसेच पंतप्रधान मोदींच्या लोकसभेतील उत्तराच्या भाषणाच्या मुद्यांवर बोलताना 'गेल्या चार दिवसांपासून सभागृहाचं कामकाज होत नाहीये', असं खरगे यांनी म्हटलं.

## उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे संचालक आरोग्य सेवांची पाहणी

### सिकलसेल अरुणोदय कार्यक्रमासह सर्व विभागांचा सखोल आढावा; गुणवत्तापूर्ण व वेळेवर आरोग्यसेवेच्या सूचना

**आत्ताच एक्सप्रेस**

**गोकुंदा** – डॉ. विजय कंदेवाड (संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र) यांनी आज उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे प्रत्यक्ष भेट देऊन रुग्णालयातील सर्व विभागांची सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी रुग्णालयातील वैद्यकीय सेवा, मनुष्यबळ, सुविधा, रुग्णसेवा व विविध आरोग्य कार्यक्रमांचा सूक्ष्म आढावा घेतला.

विशेषतः सिकलसेल अरुणोदय कार्यक्रमाचा सविस्तर व परिपूर्ण आढावा घेताना, आदिवासी बहुल भागात कार्यरत असलेल्या या रुग्णालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. कोणताही रुग्ण आरोग्यसेवेपासून वंचित राहू नये, तसेच प्रत्येक रुग्णाला गुणवत्तापूर्ण व वेळेत आरोग्य सेवा मिळावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी यावेळी दिल्या.






रुग्णालयाची कामगिरी (माहे एप्रिल २०२४ ते जानेवारी २०२६ अखेर)

पाहणीदरम्यान सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे उल्लेखनीय सेवा देण्यात आली आहे

नॉर्मल डिलिव्हरी : ४३४
सिझेरियन डिलिव्हरी : ६८
मोठ्या शस्त्रक्रिया : ८०
लहान शस्त्रक्रिया : ९२८
कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया : ९२९
मोतीबिंदू शस्त्रक्रिया : ९७
सोनोग्राफी तपासणी : ९६३
ई.सी.जी. तपासणी : २,०००
सी.टी. स्कॅन : २,६१०
डायलिसिस : २०३
टी.बी. रुग्ण : ३९
एक्स–रे तपासणी : ४६९
सोनोग्राफी स्कॅन (इतर) : ९९७

ही आकडेवारी पाहता आदिवासी व दुर्गम भागात असूनही उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा रुग्णसेवेत आघाडीवर असल्याचे स्पष्ट होते.

उपजिल्हा रुग्णालयाच्या वतीने डॉ. डी. जी. केंद्रे (वैद्यकीय अधीक्षक) यांनी मा. डॉ. विजय कंदेवाड साहेबांचे स्वागत केले. यावेळी डॉ. संजय पेरके (जिल्हा शल्यचिकित्सक, नांदेड), डॉ. संगीता देशमुख (जिल्हा आरोग्य अधिकारी), डॉ. राजाभाऊ बुट्टे (निवासी वैद्यकीय अधिकारी) यांचेही रुग्णालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालक आरोग्य सेवांच्या भेटीमुळे कर्मचारी वर्गात नवचैतन्य निर्माण झाले असून रुग्णसेवा अधिक प्रभावी करण्यासाठी मार्गदर्शन मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

# साहित्यनगरी कोळीकोड

साहित्य-संस्कृतीचा वारसा कसा पुढे न्यायचा याचा कोळीकोडने उभारलेला आदर्श पुण्याने घ्यायला हवा. अवकाशातून पृथ्वीकडे पाहताना, वसुंधरेवरील सर्व वादविवाद आणि संघर्ष निरर्थक वाटतात. आपण सर्व मानव, तसेच पशु-पक्षी या ग्रहावर एकत्र राहत आहोत. आपणा सर्वांचे हेच निवासस्थान आहे, तरीही आपण का भांडतो, असा प्रश्न पडतो' हे विचार आहेत, भारतीय वंशाच्या अमेरिकी अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांचे. आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावरील तीन मोहिमांचा आणि तब्बल सहाशे दिवस अवकाशात राहण्याचा अनुभव असलेल्या विल्यम्स यांनी हे विचार मांडले ते केरळ लिटरेचर फेस्टिव्हलच्या (केएलएफ) व्यासपीठावर. गेल्या आठवड्याच्या सुरुवातीला कोळीकोड येथे झालेल्या या साहित्योत्सवाच्या त्या एक प्रमुख आकर्षण होत्या. साहित्योत्सवाशी अंतराळवीराचा काय संबंध, असा प्रश्न कोणी विचारूही शकतो; परंतु साहित्य हे सर्वस्पर्शी असल्याने विविध विषयांवर मंथन घडवून आणणे हाच अशा उत्सवाचा मुख्य हेतू असतो. गेल्या नऊ वर्षांपासून केरळ साहित्योत्सव तो अत्यंत गांभीर्याने साध्य करीत आहे. 'केएलएफ'मधील यंदाच्या सहभागी वक्त्यांची यादी त्याची समृद्धी स्पष्ट करणारी आहे. अब्दुलरझाक गुरनाह आणि अभिजित बॅनर्जी हे अनुक्रमे साहित्यातील आणि अर्थशास्त्रातील 'नोबेल'विजेते, विख्यात लेखक सलमान रश्दी, पिको अय्यर, इतिहासकार रोमेला थापर, 'बुकर'विजेत्या किरण देसाई, 'ज्ञानपीठ'विजेत्या प्रतिभा राय, ख्यातनाम अभिनेते प्रकाश राज, काँग्रेसचे नेते शशी थरूर, 'विकिपीडिया'चे सहसंस्थापक जिमी वेल्स अशी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवरील दिग्गजांनी महोत्सवात विचार मांडले. तब्बल साडेतीनशे सत्रे, ५८६ वक्ते आणि चार दिवसांत सुमारे सात लाख साहित्यरसिकांनी लावलेली वर्दी यांतून या महोत्सवाच्या गुणवत्तेची कल्पना यातून येते. ज्या कोळीकोड शहरात हा महोत्सव भरला, ती भारतातील एकमेव 'साहित्यनगरी' आहे. २०२३मध्ये 'युनेस्को'ने कोळीकोडला हा दर्जा बहाल केला. ग्रंथ आणि साहित्य यांचा वारसा समर्थपणे पुढे नेणाऱ्या शहरांना 'युनेस्को'तर्फे २००४पासून हा दर्जा दिला जातो. सध्या ३९ देशांतील ५३ शहरे 'साहित्यनगर' म्हणून ओळखले जातात. केरळच्या किनारपट्टीवरील सुमारे वीस लाख लोकसंख्येच्या कोळीकोडचा साहित्यासाठी लौकीक निर्माण झाला, तो तेथील साहित्यिक, वाचनसंस्कृती आणि साहित्यरसिक यांच्यामुळे. साहित्य परंपरेचा लिखित इतिहास, लेखक-प्रकाशकांची, प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची आणि ग्रंथालयांची संख्या, साहित्य विषयक कार्यक्रम अशा अनेक निकषांवर कोळीकोडने 'साहित्यनगरी'चा दर्जा कमावला आहे. कोळीकोड जिल्ह्यात ५४५ ग्रंथालये आहेत. कोळीकोड हे केरळचे प्रमुख साहित्य-संस्कृती केंद्र. वैकोम महंमद बशीर ऊर्फ 'बेपोर सुलतान', एस. के. पोट्टेकट, 'ज्ञानपीठ'विजेते एम. टी. वासुदेवन नायर, उरुब, तिक्कोडियन, सुकुमार अळिकोड, पी. वलसा आदी मल्याळी भाषेतील ख्यातनाम साहित्यिक कोळीकोडचेच. वैकाम महंमद बशीर यांनी आपल्या लेखन आणि कथन शैलीने मल्याळी साहित्यात आमूलाग्र बदल घडवले. अशा दिग्गज साहित्यिकांचा वारसा, साहित्य-संगीत-कला यांच्यासाठीच्या संस्था, कार्यक्रम यांनी कोळीकोड समृद्ध होत गेले. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्याला कोळीकोडप्रमाणेच साहित्य-संस्कृतीचा वारसा आहे. पुण्याने अनेक नामवंत साहित्यिक दिले आणि अन्य शहरांतील साहित्यिकांना आकर्षितही केले. साहित्य संस्थांचे जाळेही पुण्यात आहे. ग्रंथालयांची संख्या अलीकडे रोडावत आहे हे खरे; परंतु येथे वाचनसंस्कृती आहे. वसंत व्याख्यानमालेपासून उपनगर साहित्य संमेलनांपर्यंत आणि विविध संगीत कार्यक्रमांपासून सांस्कृतिक उत्सवांपर्यंत विविध कार्यक्रमांची रेलचेल पुण्यात वर्षभर असते. गेल्या तीन वर्षांपासून 'पुणे पुस्तक महोत्सवा'ने पुण्याचा लौकीक वाढविला आहे. पुस्तकांच्या जागतिक नकाशात पुण्याला नेण्याचा संकल्पही सोडला गेला आहे. तो सिद्धीस नेण्यासाठीच्या सध्याच्या प्रयत्नांबरोबरच खरे आव्हान आहे, ते पुण्यातील साहित्य-संस्कृतीच्या वारशाचा दस्तवेज तयार करण्याचे, साहित्यविषयक कार्यक्रमांची गुणवत्ता उंचावण्याचे, वैचारिकता वाढविण्याचे. ते पेलण्याचा मार्ग कोळीकोडने आणि केरळ साहित्योत्सवाने दाखविला आहे. साहित्य संस्थांच्या राजकारणात आणि 'इव्हेंटीकरणा'त रमलेले धुरीण आणि पुणेकर रसिक हे आव्हान पेलतील?

# गेमचेंजर करार

भारत आणि युरोपीय महासंघामध्ये खुला व्यापार करार झाल्यानंतर अमेरिकेला चांगल्याच मिरच्या झोंबल्या. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एकामागून एका देशाला अतिरिक्त कर लादत आहेत. भारतावरही त्यांनी पन्नास टक्के आयात शुल्क लादले. म्हणूनच भारताने जगातील अनेक देशांबरोबर करार करण्यासाठी वेगवान पावले उचलली. म्हणूनच हा 'गेमचेंजर' करार अमेरिका, चीनसारख्या देशांना खुपणे स्वाभाविक आहे.

भारत-युरोपीय महासंघातील मुक्त व्यापार करार हा दोन अब्ज लोकांच्या बाजारपेठेसाठी आतापर्यंतचा सर्वात महत्त्वाकांक्षी करार आहे. या कराराला 'मदर ऑफ ऑल डील्स' म्हटले जात आहे. भारतासोबतच्या मुक्त व्यापार करारांतर्गत युरोपीय महासंघाने दिलेल्या आयात शुल्क सवलतींमुळे

२७ राष्ट्रांच्या गटाला होणारी देशाची निर्यात वाढून देशांतर्गत उत्पादन वाढेल. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताचा युरोपीय महासंघाचा द्विपक्षीय वस्तूंचा व्यापार १३६.५३ अब्ज डॉलर्सचा होता. त्यात ७५.८५ अब्ज डॉलर्सची निर्यात आणि ६०.६८ अब्ज डॉलर्सची आयात होती. यामुळे युरोपीय महासंघ भारताचा सर्वात मोठा वस्तू-व्यापार भागीदार बनला आहे. भारताच्या एकूण निर्यातीपैकी युरोपीय महासंघ बाजारपेठेचा वाटा अंदाजे १७ टक्के आहे, तर भारतात युरोपीय महासंघाची निर्यात भारताच्या एकूण परदेशी आयातीपैकी नऊ टक्के आहे. हा करार पुढील वर्षाच्या सुरुवातीला लागू होण्याची अपेक्षा आहे. युरोपीय महासंघ हा जगातील सर्वात मोठा आयातदार आहे. 'कराराची जननी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या करारामुळे भारताला महत्त्वपूर्ण फायदे मिळण्याची अपेक्षा आहे. भारतातील जवळजवळ सर्व निर्यात वस्तू २७ युरोपीय देशांमध्ये शून्य किंवा अत्यंत कमी कर दराने प्रवेश करतील. देशातील कृषी उत्पादक, सेवा पुरवठादार आणि औषधनिर्माण आणि कापड उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांना याचा फायदा होईल. यामुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे. तथापि, हा करार अमेरिका आणि चीनच्या आर्थिक गतिमानतेसाठी एक नवीन आव्हान निर्माण करू शकतो.

अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क आणि चीनने संवेदनशील वस्तूंवर निर्यात निर्बंध लादून निर्माण केलेला दबाव या करारामुळे निरर्थक ठरण्याची शक्यता आहे. ताज्या करारामुळे स्थिर लोकसंख्या असलेल्या युरोपीय देशांना मोठी बाजारपेठ मिळेल. या करारामुळे युरोपीय संघालाही लक्षणीय फायदा होण्याची अपेक्षा आहे. युरोपीय देश सध्या उच्च महागाई आणि आर्थिक मंदीचा सामना करत आहेत. लोकसंख्या वाढीमध्ये लक्षणीय घट झाल्यामुळे तेथे वस्तूंचा वापर थांबत आहे. या परिस्थितीत युरोपीय कंपन्यांना १.४ अब्ज लोकसंख्या असलेला भारतासारखा देश मित्र म्हणून समोर आला आहे. तो त्यांच्या वस्तूंसाठी एक प्रमुख केंद्र बनू शकतो. यामुळे संपूर्ण युरोपची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. इटली आणि फ्रान्ससारखे देश महागड्या वाइन उत्पादनासाठी जगप्रसिद्ध आहेत. आतापर्यंत भारतात या वाइनच्या विक्रीवर शंभर टक्के किंवा त्याहून अधिक कर आकारला जात होता. तथापि, करारानंतर हे दर सुमारे दहा टक्क्यांपर्यंत कमी केले जाऊ शकतात. यामुळे भारतातील परदेशी वाइनची विक्री आणि युरोपचा नफा वाढू शकतो. परिणामी, भारतीय वाइनप्रेमींना परवडणाऱ्या किमतीत उच्च दर्जाच्या परदेशी वाइन उपलब्ध होतील.

भारतात महागड्या परदेशी वाहनांच्या खरेदीदारांचा मोठा ग्राहकवर्ग आहे. मात्र युरोपीय बनावटीच्या कार खरेदी करण्यासाठी जादा कर लागतात. ते बहुतेकदा वाहनांच्या किमतीइतकेच असतात. त्यामुळे नोंदणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर वाहनाची खरेदी किंमत दुप्पट होते. तथापि, आता भारत-युरोपीय व्यापार करारानंतर हे कर लक्षणीयरीत्या कमी होण्याची अपेक्षा आहे. यामुळे युरोपीय देशांना भारतात उच्च दर्जाच्या कार विकण्याची संधी मिळेल आणि भारतातील नवश्रीमंतांना परवडणाऱ्या किमतीत उच्च दर्जाच्या कार मिळू शकतील. भारतात स्वस्त कामगार उपलब्ध होतील, रोजगार वाढेल. अमेरिकेने देशात काम करणाऱ्या परदेशी नागरिकांसाठी व्हिसा नियम कडक केले आहेत. आज अमेरिका परदेशी नागरिकांना नोकरी देण्यापासून रोखत असल्याचे दिसून येते. तथापि, युरोपीयन अर्थव्यवस्था सेवा क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. ती त्यांच्या एकूण जीडीपीमध्ये ७० टक्के योगदान देते. परिणामी, युरोपीयन सेवा कंपन्यांना भारतात परवडणारे, कुशल कामगार उपलब्ध होतील. यामुळे भारत आणि युरोप या दोघांनाही लक्षणीय फायदे मिळण्याची शक्यता आहे. आतापर्यंत अमेरिका भारताला रशियाकडून तेल खरेदी करण्यापासून रोखण्यासाठी उच्च शुल्क लादत होती. ही रणनीती काम करत असल्याचे दिसून येते. कारण रिलायन्ससह अनेक भारतीय कंपन्यांनी रशियाकडून तेल खरेदी लक्षणीयरीत्या कमी केली आहे. ट्रम्प युरोपलाही अशाच प्रकारच्या धमक्या देत आहेत. मात्र ताज्या कराराबाबत नाराजी दाखवणारी अमेरिका हा खेळ आपल्या हातून निसटताना पाहत आहे.

अमेरिका आपल्या अर्थव्यवस्थेच्या बळावर युरोपीय देशांना धमकावण्याचा प्रयत्न करत होती; परंतु युरोपला भारतात मोठी आणि परवडणारी बाजारपेठ मिळाल्याने अमेरिकेला आपले डावपेच अपयशी ठरताना दिसत आहेत. ट्रम्प प्रशासनातील ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसंट यांनी याला 'युरोपने अमेरिकेशी केलेला विश्वासघात' म्हटले आहे. त्यांनी म्हटले आहे, की या करारात सामील होऊन युरोप स्वतःविरुद्ध लढल्या जाणाऱ्या युद्धाला अप्रत्यक्षपणे वित्तपुरवठा करत आहे. अमेरिका रशियन तेल खरेदी करण्यापासून रोखण्यासाठी युरोपीय देशांवरही शुल्क लादण्याबद्दल बोलत होती. तथापि, युरोपला भारतात मोठी बाजारपेठ मिळाल्याने या शुल्काचे महत्त्व जवळजवळ संपुष्टात येऊ शकते. या करारामुळे भारतातील सर्वात असुरक्षित आणि 'एमएसएमई' क्षेत्राला फायदा होण्याची शक्यता आहे. भारत अजूनही अमेरिका आणि युरोपला तयार कृषी उत्पादने, कपडे आणि औषधे निर्यात करतो. देशातील सर्वात असुरक्षित किंवा मध्यमवर्ग कपडे आणि कृषी उत्पादनांमध्ये काम करत असल्याने युरोपीय देशांसोबत वाढलेल्या व्यापाराचा या वर्गाला थेट फायदा होण्याची शक्यता आहे. यामुळे या क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मिती वाढण्याची शक्यता आहे. युरोपीय संघ आणि भारत यांच्यातील या करारावर अमेरिका खूश नाही. त्यांनी भारत आणि युरोपीय महासंघाला 'देशद्रोही'ही म्हटले होते, तर रशियाकडून तेल आयातीसाठी भारतावर अतिरिक्त २५ टक्के कर लादला होता. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करार अद्याप अंतिम झालेला नाही, तर युरोपीय महासंघात करार अंतिम झाला आहे.

भारतीय निर्यातदारांना २७ युरोपीय देशांमध्ये अंदाजे ४५० दशलक्ष उच्च-उत्पन्न ग्राहकांना शून्य दरात किंवा अत्यंत कमी दराने प्राधान्याने प्रवेश मिळेल. युरोपीय महासंघ सध्या १२५ अब्ज डॉलर्स किमतीचे कापड आणि वस्त्रोद्योग आयात करते. यामध्ये भारताचा वाटा फक्त पाच ते सहा टक्के आहे. दुसरीकडे, चीनचा बाजारहिस्सा तीस टक्के असून बांगलादेश आणि पाकिस्तानचा एकत्रित बाजार वीस टक्के आहे. बांगलादेश आणि पाकिस्तानला युरोपीय महासंघाकडून शून्य कर आकारणीचा फायदा होतो. खुल्या व्यापार करारामुळे भारत या देशांच्या करसमानतेत येईल. परिणामी, अमेरिकेच्या ५० टक्के कर आकारणीमुळे तोटा सहन करणाऱ्या भारतीय कापड उद्योगाला आपली उत्पादने विकण्यासाठी नवी बाजारपेठ मिळेल. पादत्राणे, चामड्याच्या वस्तू, रत्ने आणि दागिने यासारख्या क्षेत्रांच्या निर्यातीत लक्षणीय वाढ दिसून येईल. भारतीय औषध कंपन्यांसाठी केवळ कर कपातीतच मुख्य फायदा नाही, तर नियामक अडथळे कमी करणे आणि मानकांची परस्परमान्यता याचादेखील फायदा आहे. यामुळे भारतीय जेनेरिक औषधे आणि विशेष रसायने युरोपीय बाजारपेठेत अधिक सहजपणे प्रवेश करू शकतील. यामुळे भारताचे अमेरिकेवरील अवलंबित्व कमी होईल.

या करारामुळे युरोपीय गुंतवणूक स्वच्छ ऊर्जा, अक्षय ऊर्जा, औषधनिर्माण आणि प्रगत उत्पादन यासारख्या क्षेत्रांकडे भारतात आकर्षित होईल. शिवाय भारतीय कंपन्या युरोपीय पुरवठा साखळ्यांमध्ये एकत्रित होतील. त्यामुळे जागतिक उत्पादन नेटवर्कमध्ये भारताचे स्थान मजबूत होईल. शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी शेती आणि दुग्धशाळेसारख्या संवेदनशील क्षेत्रांना कराराच्या व्याप्तीतून वगळले आहे.

– शिवाजी कराळे

***

# ॲमेझॉन एमएक्स प्लेयरतर्फे त्यांचा आगामी कोर्टरूम ड्रामा 'अमर विश्वास'चा ट्रेलर प्रसिद्ध

भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेयर'ने आज सत्ता, गुन्हेगारी आणि न्यायाचे पदर असलेला, कथानकाला गहनता लाभलेला मनोरंजक कोर्टरूम ड्रामा 'अमर विश्वास' या आगामी ओरिजनल सिरीजच्या ट्रेलरचे अनावरण केले. रवी बहल, आमिर अली आणि बरखा बिष्ट यांच्यासमवेत राजीव खंडेलवालची मुख्य भूमिका असलेली ही मालिका उच्च-जोखमीच्या न्यायालयीन लढाईसाठी मंच तयार करते; जिथे सत्य हे दुर्लक्षित असते आणि न्यायाला मोठी किंमत मोजावी लागते.

ट्रेलरची सुरुवात प्रभावशाली सिनेनिर्माते जेसू मोमीन यांच्या क्रूर हत्येपासून होते. ज्या प्रकरणाला प्रसारमाध्यमे त्वरित ओपन-अँड-शट हे लेबल लावतात. लोकांच्या समजुतीनुसार आधीच दोषी ठरलेल्या बहार चक्रवर्ती या तरुणीवर लगेच संशय येतो. 'अमर विश्वास' हा या शर्यतीत उतरणारा एक हटके आणि चाणाक्ष वकील आहे. निव्वळ तथ्यं क्वचितच संपूर्ण कथेवर प्रकाश टाकतात हे त्याला पक्के ठाऊक आहे. अमर हा बहरचा बचाव करत असताना, तो शोषण, हेराफेरी आणि दीर्घकाळ दडवून ठेवलेल्या रहस्यांचे कंगोरे उघड करू लागतो. ज्यामुळे एक कट उघडा पडतो. जो सुरुवातीला दिसतो त्यापेक्षा अधिक खोल आणि गडद असतो.

सुहास शिरवळकर यांच्या वाचक पसंतीस उतरलेल्या कादंबऱ्यांवर आधारित, अमर विश्वास' ही कलाकृती अर्जुन सिंह बरान आणि कार्तिक डी. निशांदार यांनी च्या बॅनरखाली तयार केला आहे. अमर विश्वासमध्ये कोर्टरूम ड्रामाची तीव्रता आणि तपास गुन्ह्याची तीव्रता यांचे मिश्रण आहे. जसजसे प्रकरण समोर येते, तसतसे अमरला हा हेतू, साधने आणि संधी या कपटी त्रिकुटाला स्थापित करण्यासाठी काळाशी झुंज द्यावी लागते. त्याच्या स्वतःच्या माजी मेंटॉरसह कायदेशीर विचारांच्या विरोधात स्वतःला उभे करत असल्याचे जाणवते. प्रत्येक युक्तिवाद, उलटतपासणी आणि प्रकटीकरणासह, ही सिरीज 'सत्य शेवटी न्यायाकडे नेईल का?' हा एक अस्वस्थ करणारा प्रश्न उपस्थित करते.

या सिरीजबद्दल बोलताना ॲमेझॉन एमएक्स प्लेयर'चे डायरेक्टर आणि हेड ऑफ कंटेंट अमोघ दुसाद म्हणाले, ''अमर विश्वास ही कलाकृती मराठी साहित्यातील एक महान व्यक्तिमत्व सुहास शिरवळकर यांच्या लेखणीने प्रेरित आहे. ज्यांच्या लिखाणाने भारतीय कथाकथनाच्या पिढ्यांवर प्रभाव पाडला आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरमध्ये, भारतीय संस्कृती आणि भावनांमध्ये खोलवर रुजलेल्या कथा सांगण्यासाठी आम्ही जाणीवपूर्वक अशा प्रतिष्ठित साहित्यिकांच्या कथा हाताळतो. आजच्या प्रेक्षकांसाठी या प्रसिद्ध साहित्याची नव्याने कल्पना करून, आम्ही भावना आणि कथा; दोन्हींमध्ये प्रामाणिकपणे भारतीय राहण्याचे उद्दिष्ट ठेवतो. ही सिरीज, खिळवून ठेवणारा कोर्टरूम ड्रामा आणि मजबूत भावनिक गाभा असलेली, भव्य आशय दृष्टी (कंटेंट व्हीजन) प्रतिबिंबित करते. हे कथानक स्वदेशी वाटेल आणि देशभरातील प्रेक्षकांना अधिक अर्थपूर्ण रितीने जोडून ठेवेल.''

मुख्य भूमिका साकारण्याबाबतचे आपले विचार मांडताना राजीव खंडेलवाल म्हणाला, ''अमर विश्वास हा पारंपरिक न्यायालयीन नायकापासून खूप दूर आहे. तो सदोष, सहज प्रवृत्तीचा आणि न्यायाच्या सखोल भावनेने प्रेरित मात्र आवाज नसलेला आहे. तो सतत ज्या नैतिक तणावात जगत असतो, जिथे उघड झालेल्या प्रत्येक सत्याला किंमत मोजावी लागते. मला या गोष्टीने भूमिकेकडे आकर्षित केले. या मालिकेतील पात्राच्या प्रवासातील पार्श्वभूमीवरील केवळ ओरखडे या ट्रेलरमध्ये दाखवले आहे.''

या सिरीजमध्ये महत्त्वाची भूमिका साकारणारा आमिर अली पुढे म्हणाला, ''संघर्ष किती तळागाळातील आहे ही अमर विश्वासला बळकट करणारी गोष्ट. पात्रे जितकी धूसर राहतात, कायदेशीर लढाया जितक्या कायद्याच्या बाबतीत असतात तितकीच सत्ता आणि समज याबद्दल असतात. या पदरांची उकल करणाऱ्या कथेचा भाग होण्याची संधी फायदेशीर ठरली आहे.''

आपले विचार मांडताना, क्रिएटर आणि प्रोड्यूसर, अर्जुन सिंग बरान आणि कार्तिक डी. निशांदार म्हणाले, ''अमर विश्वास'ची निर्मिती एका अशी कथा सांगण्याच्या इच्छेतून येते; जी खोलवर रुजलेली असली तरी आजच्या घडीला प्रासंगिक वाटते. सुहास शिरवळकर यांच्या लिखाणात दुर्मीळ भावनिक प्रामाणिकपणा आणि नैतिक सखोलता आहे. समकालीन प्रेक्षकांसाठी कथेला आकार देताना त्यांच्या वारशाचा सन्मान करण्याचा आमचा प्रयत्न होता. ही मालिका मजबूत पात्रे, पदर असलेले कथाकथन आणि जिवंत तसेच वास्तविक वाटणाऱ्या कायदेशीर जगात रुजलेली आहे.''

'अमर विश्वास' तणावपूर्ण न्यायालयीन संघर्ष, अनेक कंगोरे असलेला तपास आणि सत्याच्या मागणीत नियम मोडण्यास तयार असलेला मध्यवर्ती नायक देण्याचे आश्वासन देतो. ही सिरीज ११ फ ेब्रुवारी २०२६ पासून ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर विशेष स्ट्रीम होईल, जी एमएक्स प्लेयर ॲप, ॲमेझॉन शॉपिंग ॲप, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही आणि कनेक्टेड टीव्हीवर उपलब्ध असेल.

# ब्रिटानिया ट्रीट क्रीम वेफर्सने जागतिक ॲनिमे आयकॉन 'नारुतो'सोबत सहयोग साधत स्पेशल एडिशन पॅक सादर

नाशिक दि.५ (प्रतिनिधी)- निन्जांच्या जगात प्रत्येक कृतीला एक असे महत्त्व असते. यामध्ये अचूक वेळेवर केलेला हाताचा संकेत असो किंवा एकाग्रतेचा क्षण वा प्रयत्नांतून साधलेला छोटा विजय असो, अश्या प्रत्येक घटकांमुळे नायकाचा प्रवास निश्चित होत असतो. याच संकल्पनेतून प्रेरणा घेत ब्रिटानिया ट्रीट क्रीम वेफर्सने जागतिक ॲनिमे आयकॉन नारुतो साठी सोनी वायएवाय सोबत भागीदारीची घोषणा केली आहे.या भागीदारीअंतर्गत ब्रिटानिया ट्रीट क्रीम वेफर्स यांनी नारुतो विश्वावर आधारित विशेष आवृत्तीचे पॅक सादर केले आहेत. त्यामुळे नारुतो फ्रँचायझीसोबत भागीदारी करणारा भारतातील पहिला एफएमसीजी ब्रँड म्हणून ब्रिटानियाची नोंद झाली आहे.

या सहकार्याबद्दल बोलताना, ब्रिटानियाचे महाव्यवस्थापक, मार्केटिंग, सिद्धार्थ गुप्ता म्हणाले की, ॲनिमे हा भारतातील तरुण ग्राहकांमध्ये सांस्कृतिक प्रभाव म्हणून मोठ्या प्रमाणात उदयास आला आहे. नारुतो ही या क्षेत्रातील सर्वाधिक ओळखली जाणारी व आवडत्या फ्रँचायझींपैकी एक आहे. या विशेष सहकार्याद्वारे नारुतोचे जग आमच्या ग्राहकांपर्यंत पोहोचवताना आम्हाला आनंद होत आहे. या उपक्रमातून ग्राहकांसाठी आम्ही एक संवादात्मक अनुभव उपलब्ध करून देत आहोत, ज्यामुळे चाहत्यांना गेमिंग स्वरूपात नारुतो विश्वाशी संवाद साधता येईल. तसेच ब्रिटानियामध्ये आम्ही नेहमीच ग्राहकांशी अर्थपूर्ण तसेच सांस्कृतिकदृष्ट्या सुसंगत नाते निर्माण करणाऱ्या नाविन्यपूर्ण संवादपद्धतींचा सातत्याने शोध घेत असतो.

या सहकार्याविषयी बोलताना सुजॉय रॉय बार्धन, मार्केटिंग हेड, ओएपी आणि लायसन्सिंग व मर्चेंडायझिंग विभागाचे प्रमुख, सोनी वायएवाय! यांनी सांगितले की, आता भारतात ॲनिमे ही एक मुख्य प्रवाहातील सांस्कृतिक शक्ती म्हणून विकसित झाली आहे. नारुतोसारख्या फ्रँचायझींनी अनेक पिढ्यांमध्ये पसरलेला आपला एक मोठा चाहतेवर्ग निर्माण केला आहे. ब्रिटानियाबरोबरच्या अशा प्रकारच्या सहकार्यांमुळे ब्रँड्सना या सांस्कृतिक प्रवाहाचा लाभ घेता येतो, तसेच नवीन प्रेक्षकांशी अर्थपूर्ण आणि नाविन्यपूर्ण अनुभवात्मक मार्गांनी जोडले जाता येते.

यावेळी दीपशिखा रवी, राष्ट्रीय क्रिएटिव्ह डायरेक्टर, शबँग यांनी सांगितले की, ही मोहीम ब्रिटानिया ट्रीट क्रीम वेफर्सला असा ब्रँड म्हणून सादर करते, जो मोठ्या यशाबरोबरच दैनंदिन जीवनाला आकार देणाऱ्या छोट्या विजयांचीही दखल घेतो. नारुतो सोबतच्या या भागीदारीच्या माध्यमातून ब्रिटानिया ट्रीट हे प्रत्येक वेळी एका ट्रीटद्वारे महत्त्वाच्या क्षणांमध्ये आपली उपस्थिती ही अधिक ठळकपणे दर्शवते.

नारुतो ही जागतिक पातळीवर ओळख निर्माण केलेली सांस्कृतिक मालिका आहे. या मालिकेत नारुतो उझुमाकी या अढळ इच्छाशक्ती असलेल्या युवकाच्या प्रवासाचे चित्रण करण्यात आले आहे. आपल्या गावाचा नेता, म्हणजेच होकागे होण्याचे त्याचे स्वप्न या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे. या मालिकेतील कृतीचा केंद्रबिंदू 'जुत्सु' ही संकल्पना असून, निन्जांकडून वापरल्या जाणाऱ्या गूढ कला अथवा तंत्रांचा त्यात समावेश होतो. ही तंत्रे पारंपरिक निन्जांच्या हातांच्या मुद्रांच्या अचूक क्रमांद्वारे सुरू केली जातात. ही प्रक्रिया कौशल्य तसेच समर्पण या दोन्ही घटकांवर आधारित असल्याचे मालिकेत दर्शवले आहे.

या लाँचच्या केंद्रस्थानी शबँग यांनी संकल्पित केलेली ही मोहीम आहे. ही मोहीम निन्जाच्या शिस्तीचा तसेच दैनंदिन जीवनातील लवचिकतेचा संदर्भ मांडते. या मोहिमेतील फिल्ममध्ये शांत राहून भीती आणि अनिश्चिततेच्या क्षणांवर मात करणाऱ्या व्यक्तींना दैनंदिन जीवनातील निन्जा म्हणून दर्शविले आहे.

तसेच प्रत्येक लहान चांगल्या कृतीसाठी बक्षीस मिळावे, या विश्वासाला ही मोहीम अधोरेखित करते. तसेच ग्राहकांना स्वतःमधील नारुतोची ऊर्जा व्यक्त करण्यासाठी प्रेरित करत, ही मोहीम लहान व अर्थपूर्ण कृतींमधून प्राप्त होणाऱ्या सामर्थ्याचा उल्लेख करते.

# मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या हस्ते जिल्हास्तरीय उत्कृष्ट आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तक पुरस्कार वितरण

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या हस्ते येथील नक्षत्र सभागृहात आज जिल्हास्तरीय उत्कृष्ट आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तक पुरस्कार वितरण करण्यात आले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृद्धी दिवाणे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड, डॉ. संदीप काळे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री. शंकर तावडे, जिल्हा समूह संघटक अजहर अली आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी अध्यक्षीय भाषणात आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तकांशी संवाद साधत गावपातळीवर आरोग्य सेवा देताना प्रामाणिकपणे व स्पर्धात्मक भावनेने काम केल्यास त्याचे निश्चित फळ मिळते, असे सांगून आज मिळालेला सन्मान हा त्यांच्या कार्याची खरी पावती असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गायकवाड यांनी सांगितले. तसेच हिंगोली तालुका सध्या आकांक्षित तालुक्यात असल्याने येत्या सहा महिन्यांत सकारात्मक प्रयत्न करून तो आकांक्षित यादीतून बाहेर काढण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून धन्वंतरीच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी केले.

यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तक यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते पुरस्कार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

भांडेगाव येथील श्रीमती भाग्यरथा शिवाजी शिखरे यांना ५००० रुपये रोख प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर मासोड येथील श्रीमती मुक्ता शेकुराव खुडे व्दितीय (३००० रुपये), सिद्धार्थनगर येथील श्रीमती आशा गजानन कोरडे तृतीय (२००० रुपये रोख) क्रमांकाने सन्मानित करण्यात आले.

पिंपळदरी येथील श्रीमती वंदना गजानन लेकुळे, प्रथम, पिंपळदरी येथील श्रीमती वैशाली गणेश ढगे, द्वितीय तर जवळा बाजार येथील श्रीमती अर्चना बापूराव दिपके तृतीय असा अनुक्रमे तीन, दोन आणि एक हजार रुपये रोख पुरस्कार प्रदान करण्यात आला. कुरुंदा येथील श्रीमती निता भारत गायकवाड प्रथम, गिरगाव येथील श्रीमती प्रेमिला गजानन रानखांब द्वितीय तर कुरुंदा येथील श्रीमती भारती रमेश गायकवाड यांना तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. नर्सी येथील श्रीमती प्रणाली प्रल्हाद खिलारे प्रथम, भांडेगाव येथील श्रीमती अनिता अशोक जळके द्वितीय तर नर्सी येथील श्रीमती नीता प्रदीप जयस्वाल यांना तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. डोंगरकडा येथील श्रीमती कविता दयानंद थोरात प्रथम, वाकोडी येथील श्रीमती पद्मिना सोपान पाईकराव द्वितीय तर आखाडा बाळापूर येथील श्रीमती शोभा गणेश तोरकड तृतीय क्रमांक मिळाला. साखरा येथीलच श्रीमती सुचिता शामराव पांडे, प्रथम, श्रीमती सीमा रेणुकादास पांडे द्वितीय आणि श्रीमती शारदा राहुल वाघमारे यांनी क्रमांकाचा पुरस्कार पटकावला. आखाडा बाळापूर येथील श्रीमती रेणुका दिवाकर देशपांडे प्रथम क्रमांकाचा, शिरडशहापूर येथील श्रीमती प्रणिता दिलीपराव काळे द्वितीय तर कुरुंदा येथील श्रीमती शांता संजय गायकवाड तृतीय क्रमांकाचा अनुक्रमे अडीच हजार, दीड हजार आणि एक हजार रुपये रोख पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अतिरिक्त




जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. सतीश रुणवाल यांनी केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाणे यांनी आशा वर्कर या गावपातळीवरील आरोग्य व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचे नमूद करून या पुरस्कारामुळे कामाची नवी प्रेरणा मिळते, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समूल्यांकन अधिकारी अमोल कुलकर्णी, तालुका समूह संघटक बापू सूर्यवंशी, ओंकार जोशी, मारोती सोलापरे, अशोक चव्हाण व शिवानंद स्वामी यांनी परिश्रम घेतले.

# दाभाडीदरसांगवी ते चिखली तांडा रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची मागणी; ग्रामस्थांचे उपविभागीय कार्यालयात निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट –** दाभाडीदरसांगवी ते चिखली तांडा या महत्त्वाच्या ग्रामीण रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून सदर रस्त्याचे काम तातडीने हाती घेण्यात यावे, अशी ठाम मागणी आज करण्यात आली. यासंदर्भात ग्रामपंचायत दरसांगवी (चि.), ता. किनवट, जि. नांदेड यांच्या वतीने मा. सहायक जिल्हाधिकारी तथा उपजिल्हाधिकारी साहेब, उपविभागीय कार्यालय किनवट तसेच मा. उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, किनवट यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दाभाडीदरसांगवी ते चिखली तांडा हा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून पूर्णतः खराब झाला असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात रस्ता पूर्णतः चिखलमय होत असल्याने वाहनांची ये-जा अत्यंत धोकादायक बनते. या रस्त्यावरून शालेय विद्यार्थी, रुग्ण, शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघाताची शक्यता वाढली असून ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनावर याचा गंभीर परिणाम होत आहे.

तरी सदर रस्त्याचे तातडीने डागडुजी अथवा नवीन मजबुतीकरणाचे काम सुरू करून नागरिकांची होणारी गैरसोय दूर करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी सरपंच शशिकला देवराव हातमोडे, उपसरपंच




परमेश्वर कदम, भगवान कदम, अरविंद कदम, ओमप्रकाश नरवाडे, संगीत शेलार, बालाजी लांबाटे, पांडुरंग पेदेवाड, राजू हातमोडे आदी ग्रामस्थ व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन रस्त्याचे काम सुरू करावे, अन्यथा पुढील आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# अवैध गौणखनिज उत्खनन प्रकरणातील जप्त जंगम मालमत्तेचा १० फेब्रुवारी रोजी द्वितीय जाहीर लिलाव

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** स्टोन क्रशर खदानीमधून अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणात जप्त करण्यात आलेल्या जंगम मालमत्तेचा (वाहने व क्रशर मशीन) जाहीर द्वितीय फेरीचा लिलाव आयोजित करण्यात येत असल्याची माहिती तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांनी दिली आहे.

अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणात जप्त करण्यात आलेली वाहने व इतर जंगम मालमत्ता सोडविण्यासाठी संबंधित कसूरदारांना वारंवार सूचना देऊनही दंडात्मक रक्कम शासनाकडे जमा करण्यात आलेली नाही. तसेच जप्त जंगम मालमत्ता सोडविण्यासाठी मालक/कसूरदार न्यायालयासमोर हजर झालेले नाहीत. त्यामुळे एकूण सहा खदानधारकांकडील जप्त वाहने व क्रशर मशीनचा लिलाव करण्यात येणार आहे.

सदर जंगम मालमत्तेचे लघुत्तम मूल्य उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, हिंगोली यांच्याकडील दि. १९ डिसेंबर २०२५ च्या पत्रानुसार निश्चित करण्यात आले असून, त्या अनुषंगाने अटी व शर्तींच्या अधीन राहून जाहीर लिलावाची नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जप्त जंगम मालमत्तेचा जाहीर लिलाव मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत महसूल मंडळ बासंबा, भांडेगाव, डिग्रस कऱ्हाळे अंतर्गत असलेल्या स्टोन क्रशर खदानच्या ठिकाणी बोली पद्धतीने घेण्यात येणार आहे.

लिलावामध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी दि. ०९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत तहसील कार्यालयातील गौणखनिज विभागात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत प्रती वाहन १० हजार रुपये अनामत रक्कमेचा धनादेश,

पॅनकार्ड, आधारकार्ड व बँक पासबुक/स्टेटमेंटची छायाप्रत सादर करणे बंधनकारक आहे. पात्र अर्जदारांना लिलावासाठी टोकन देण्यात येईल. लिलावाबाबत सर्व अधिकार उपविभागीय अधिकारी, हिंगोली व तहसीलदार, हिंगोली यांनी राखून ठेवले असून, लिलावातील अटी व शर्तीनुसारच प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. वरील अटी व शर्ती मान्य असलेल्या इच्छुक नागरिकांनी लिलावामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांनी केले आहे.



# पैनगंगेच्या तीरावरील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता!

## काकडा आरती, हरीनाम सप्ताह, आकर्षक दिंडी, होम हवन, भजन उत्सवाने गाव दुमदुमले

**आत्ताच एक्सप्रेस**

**माहूर –** गेल्या बारा वर्षापासून सतत पैनगंगेच्या तीरावरती सुरू असलेल्या सपत्याची सांगता ह. भ. प. शिवा महाराज यांच्या कल्याच्या कीर्तनाने करण्यात आली.

हरी नामाचा गजर हरिनामाचा काठी डाव मांडिला, पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल अशा विठूरायाच्या गजरात चोले वाडी टाकळी गावात हनुमान मंदिरा पासून दिंडी काढून हरीनाम सप्ताह सोहळ्यानिमित्ताने हरिनामाचा गजर करण्यात आला गावात घरो घरी रांगोळी सडा टाकून दिंडीचे स्वागत केले सात दिवसात सुरु असलेल्या पारायण, भागवत, हरिपाठ, भारूड, महाप्रसाद आणि रात्रीला कीर्तनाचा कार्यक्रम तसेच धार्मिक कार्यक्रमांमुळे पैणगंगे काठावर जणू पंढरपुरासारखे वातावरण पाहायला मिळाले

या सोहळ्यात अनेक दानशूर व्यक्तीं यांच्या कडून महाप्रसाद देऊन विशेष सहकार्य केले तसेच या कीर्तन सोहळ्यात पारायण ह. भ. प.विलास महाराज टाकळीकर आणि भागवत ह. भ. प. शिवा बापू महाराज यांच्या मधुर वाणीतून भागवत कथा पार पडली. या अखंड हरिनाम सप्ताह विशेष म्हणजे चिमुकल्याने हरिपाठ करून उपस्थिताची मन जिंकले.यावेळी कर्तन सोहळ्यात सांगतानां येणाऱ्या पिढीतला माणूस घडवण्यासाठी अशा सोहळ्याचे आयोजन करणे काळाची गरज असल्याची भावना ह. भ.प. निवृत्ती महाराज चाटे यांनी आपल्या कीर्तनातून सांगितले!

# शेत मालकाच्या अनुपस्थितीने पानंद रस्त्याचे काम रखडले

## उभ्या पिकातून रस्ता टाकता येत नसल्याने पंधरा दिवसाची दिली मुदत

**आत्ताच एक्सप्रेस**

**श्रीक्षेत्र माहूर–** मौजे गोंडवडसा, ता. माहूर, जिल्हा नांदेड राष्ट्रीय महामार्ग माहूर- सारखणी शेत सर्वे नंबर १२२ विरुद्ध प्रतिवादी गैर-याचिकाकर्ता शेख जुबेर, शेख अझहर व इतर राहणार मौजे गोंडवडसा, ता. माहूर, जि. नांदेड सर्वे नंबर १२८ शेत सर्वे नंबर १२२ मध्ये जाण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग माहूर- सारखणी पासून गट क्रमांक १२८ आणि कॅनल यांच्या मधून दक्षिण-उत्तर, त्यानंतर गट क्रमांक १२१ व १२८ च्या मधून पूर्व-पश्चिम आणि नंतर गट क्रमांक १२१ व १२७ यांच्या बांधावरून उत्तर-दक्षिण दिशेने आठ ८ फूट रुंदीचा गाडी रस्ता खुला करण्यात यावा म्हणून माहूर तहसील चे तहसीलदार अभिजित जगताप यांचे आदेश आज दि ०५ रोजी मौजे गोंडवडसा तालुका माहूर जिल्हा नांदेड येथे माहूर तहसील चे तहसीलदार अभिजित जगताप यांच्या आदेशानुसार



गट क्रमांक १२२ ला जाण्यासाठी असलेल्या सार्वजनिक वहिवाटीच्या रस्त्याबाबत प्रत्यक्ष स्थळी पाहणी व कार्यवाही करण्यात आली.

सदर ठिकाणी सार्वजनिक वहिवाटीचा रस्ता असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत स्पष्ट झाले.परंतु याकार्यवाहीच्या वेळी गैर-अर्जदार प्रत्यक्ष स्थळी अनुपस्थित असल्या करणाने सदर रस्त्याच्या ठिकाणी उभे पीक असल्याने, नुकसान टाळण्याच्या दृष्टीने संबंधितांना पंधरा दिवसांची मुदत देण्यात आली आहे.त्यानुसार, १५ दिवसांची मुदत देऊन आदेशाप्रमाणे गट क्रमांक १२२ ला जाण्यासाठी सदर सार्वजनिक वहिवाटीचा रस्ता खुला ठेवण्यात आला, असे पंचांच्या समक्ष नोंदविण्यात आले.

यावेळी सिंदखेड सजाचे मंडळ अधिकारी बुरकुले, ग्राम महसूल अधिकारी दयानंद येरडलावार, महसूल सेवक मेश्राम,सिंदखेड पोलिस ठाण्याचे पोलीस कर्मचारी आर एस कांबळे यांच्या सह पंच मध्ये शेख अहमद शेख मेहबूब ,उपसरपंच शौकतअली शेख,माजी उपसरपंच अमजदखान पठाण, अब्दुल गफार,शेख अमीन,शेख मुजमिल,शेख जाबिर, शेख अहेमद,शेख अन्सार,यांच्या सह शेतकरी गावातील नागरिक उपस्थित होते.

तालुक्यातील पानंद रस्ते खुले करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांचा फायदा व्हावा वाहतुकीस अडथळा येऊ नये उत्पन्न वाढीसाठी पिके घेण्यास मदत व्हावी यासह इतर शेतीसंबंधी सर्व समस्या निकाली काढण्यासाठी शासनाच्या योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा तसेच कुठलीही अडचण असल्यास थेट माझेशी संपर्क साधावा असे आवाहन तहसीलदार अभिजीत जगताप यांनी यावेळी केले.

# महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिव पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार, क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कारासाठी आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी –** इतर मागास विकास विभागातंर्गत कार्यरत इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत देण्यात येणाऱ्या महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिव पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार, क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कारासाठी (२०२५-२६) पात्र व इच्छुक व्यक्ती तसेच संबंधित समाजाच्या उत्थानासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. तरी पात्र व इच्छुक व्यक्ती व संस्थांनी आपले प्रस्ताव दि. २१ फेब्रुवारी २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन सहायक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण) रामेश्वर मुंडे यांनी केले आहे.

पुरस्कारांसाठी अर्ज करणारी व्यक्ती अथवा संस्था महाराष्ट्र राज्याची रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जदाराने संबंधित समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक किंवा अन्य क्षेत्रातील उत्थानासाठी सलग व उल्लेखनीय स्वरूपाचे कार्य केलेले असावे. अर्ज विहीत नमुन्यात सादर करणे बंधनकारक असून शासन निर्णयात नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे, कार्याचा सविस्तर अहवाल व शिफारस पत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अपूर्ण, चुकीची माहिती असलेले अथवा मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत. पुरस्काराबाबत अंतिम निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल व त्यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, असे कळविण्यात आले आहे.

# मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मोबाईल वापरण्यास बंदी

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी –** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडावी तसेच मतदान केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मोबाईल फोन वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. मतदारांनी आपले मोबाईल फोन मतदान केंद्रावर आणू नयेत, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले यांनी केले आहे. परभणी तालुक्यात एकूण १० जिल्हा परिषद गट व २० पंचायत समिती गण असून, त्यासाठी २२६ मतदान केंद्र निश्चित करण्यात आली आहेत. मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत असणार आहे. निवडणूक गट क्रमांक १४ पेडगाव अंतर्गत येणाऱ्या (पेडगाव, भोगाव, पान्हेरा, गव्हा, पिंपळगाव स. मि., काष्टगाव, वडगाव तर्फे टाकळी, एकरुखा तर्फे पेडगाव, किन्होळा, ब्रम्हपुरी तर्फे पेडगाव, आर्वी व इस्माईलपूर) या गावांमध्ये प्रत्येकी दोन बॅलेट युनिट असणार आहेत. इतर सर्व मतदान केंद्रांवर एकच बॅलेट युनिट असणार आहे. तसेच एका मतदारास जिल्हा परिषद गटासाठी एक व पंचायत समिती गणासाठी एक असे दोन मतदान करावे लागणार आहे.

# ब्रिटानिया ट्रीट क्रीम वेफर्सने जागतिक ॲनिमे आयकॉन 'नारुतो'सोबत सहयोग साधत स्पेशल एडिशन पॅक सादर केले

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक –** निन्जांच्या जगात प्रत्येक कृतीला एक असे महत्त्व असते. यामध्ये अचूक वेळेवर केलेला हाताचा संकेत असो किंवा एकाग्रतेचा क्षण वा प्रयत्नांतून साधलेला छोटा विजय असो, अश्या प्रत्येक घटकांमुळे नायकाचा प्रवास निश्चित होत असतो. याच संकल्पनेतून प्रेरणा घेत ब्रिटानिया ट्रीट क्रीम वेफर्सने जागतिक ॲनिमे आयकॉन नारुतो साठी सोनी वायएवाय सोबत भागीदारीची घोषणा केली आहे.या भागीदारीअंतर्गत ब्रिटानिया ट्रीट क्रीम वेफर्स यांनी नारुतो विश्वावर आधारित विशेष आवृत्तीचे पॅक सादर केले आहेत. त्यामुळे नारुतो फ्रँचायझीसोबत भागीदारी करणारा भारतातील पहिला एफएमसीजी ब्रँड म्हणून ब्रिटानियाची नोंद झाली आहे.

या सहकार्याबद्दल बोलताना, ब्रिटानियाचे महाव्यवस्थापक, मार्केटिंग, सिद्धार्थ गुप्ता म्हणाले की, ॲनिमे हा भारतातील तरुण ग्राहकांमध्ये सांस्कृतिक प्रभाव म्हणून मोठ्या प्रमाणात उदयास आला आहे. नारुतो ही या क्षेत्रातील सर्वाधिक ओळखली जाणारी व आवडत्या फ्रँचायझींपैकी एक आहे. या विशेष सहकार्याद्वारे नारुतोचे जग आमच्या ग्राहकांपर्यंत पोहोचवताना आम्हाला आनंद होत आहे. या उपक्रमातून ग्राहकांसाठी आम्ही एक संवादात्मक अनुभव उपलब्ध करून देत आहोत, ज्यामुळे चाहत्यांना गेमिंग स्वरूपात नारुतो विश्वाशी संवाद साधता येईल. तसेच ब्रिटानियामध्ये आम्ही नेहमीच ग्राहकांशी अर्थपूर्ण तसेच सांस्कृतिकदृष्ट्या सुसंगत नाते निर्माण करणाऱ्या नाविन्यपूर्ण संवादपद्धतींचा सातत्याने शोध घेत असतो.

# मतदानासाठी कामगारांना भरपगारी सुट्टी

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी –** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीच्या अनुषंगाने शनिवार दि. ०७ फेब्रुवारी, २०२६ रोजी संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदार संघात सार्वजनिक सुट्टी जाहिर केली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील परभणी, गंगाखेड, मानवत, पाथरी, पुर्णा, सेलु, जिंतुर, सोनपेठ, पालम या जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदान क्षेत्रातील मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्य निवडणुक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी, असे राज्य शासनाने अधिसूचनेमध्ये जाहिर केले आहे.

हे आदेश मतदार संघातील सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहील. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत कामगारांना मतदानासाठी सुट्टी देण्याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी, व्यवस्थापनाने वरील आदेशाचे अनुपालन होईल याची खबरदारी घ्यावी. मतदारांना मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास त्यांच्या विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे सरकारी कामगार अधिकारी टि.ई.कराड यांनी कळविले आहे.

# जलतारा पाणीदार नांदेडच्या दिशेने भक्कम पाऊल !

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड–** नांदेड जिल्हा पाणीदार होण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी एक महत्त्वाकांक्षी आणि दूरदृष्टीपूर्ण पाऊल उचलले असून, जिल्हाभर 'जलतारा' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील मोठा भाग कोरडवाहू असून अनेक शेतकरी वर्षातून केवळ एकच पीक घेतात. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून प्रत्येक शेतात जलसंधारण व्हावे, या उद्देशाने नांदेड जिल्ह्यात एक लाख जलतारे उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

या उपक्रमासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्वतः पुढाकार घेतला असून, प्रत्येक तालुक्यातील गावांमध्ये प्रत्यक्ष जलतारा उभारणीच्या कामास सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करताना जलताराचे महत्त्व, तांत्रिक बाबी आणि दीर्घकालीन फायदे समजावून सांगण्यात येत आहेत.

**भूजलपातळी वाढीस चालना**

या मोहिमेमुळे आगामी काळात नांदेड जिल्ह्यातील भूजलपातळी वाढण्यास मोठी मदत होणार आहे. पावसाचे पाणी थेट जमिनीत मुरवून त्याचा प्रभावी वापर शक्य होणार असून, परिणामी शेतकऱ्यांना पावसाच्या पाण्यावरच वर्षातून दोन पिके घेणे शक्य होणार आहे.

**तंत्रज्ञानाची साथ मोबाईल ॲपद्वारे पारदर्शकता**

'जलतारा' उपक्रम अधिक परिणामकारक, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली आहे. प्रत्येक कामाचे जिओ-फेन्सिंग, नोंदणी, छायाचित्रण आणि प्रत्यक्ष प्रगती निरीक्षण करण्यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपचे उद्घाटन नुकतेच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रणालीमुळे कामांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता वाढून दर्जेदार व वेळेत कामे पूर्ण होणार आहेत.

**आतापर्यंतची प्रगती**

या उपक्रमांतर्गत आत्तापर्यंत ३४ हजार ४३४ जलतारांचे शेतकऱ्यांकडून प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी २८ हजार ८१४ इतक्या जलतारांना प्रशासकीय मान्यता सुद्धा देण्यात आलेल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांकडून कामाची मागणी होताच या कामांना सुरू करण्यात येणार आहे.

**नांदेड जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी**

नांदेड हा महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या दृष्टीने दहावा सर्वात मोठा जिल्हा आहे. येथील बहुतांश नागरिक शेतीवर अवलंबून आहेत. गोदावरी नदीच्या काठावर असतानाही जिल्ह्यातील अनेक शेतकरी अजूनही मोठ्या प्रमाणावर एकाच पिकावर अवलंबून आहेत.

**हाय इम्पॅक्ट मेगा वॉटरशेड प्रकल्प**

पावसाचे पाणी साठवून त्यातून वर्षातून दोन पिके घेण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भारत रुरल लाईव्हलीहूड फाऊंडेशन (), मनरेगा विभाग व जिल्हा प्रशासन नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने सहा तालुक्यांत तीन संस्थांच्या माध्यमातून हाय इम्पॅक्ट मेगा वॉटरशेड प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत ई-पीआर, शिवारफेरी, हाऊसहोल्ड सर्वे करून नागरिकांच्या गरजांनुसार पाच वर्षांचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला आहे. ग्रामसभेत मंजुरीनंतर एनआरएम, जमीन वापर आणि उपजीविकेची मालमत्ता या स्वरूपातील कामांना सुरुवात करण्यात आली असून, त्यात जलतारासारख्या कामांचा समावेश आहे.

**'Catch the Rain' संकल्पनेतून जलतारा चळवळ**

"Catch the Rain – Where it falls, When it falls" या राष्ट्रीय संकल्पनेनुसार, प्रत्येक शेतातील पाणी त्याच शेतात मुरविण्यासाठी नांदेड जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात मोठया प्रमाणात जलतारा चळवळ सुरू केली असून, येणाऱ्या कालावधीत जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या शेतात १ लाख जलतारा तयार करण्यात येणार आहेत.

**जलतारा कामाचे स्वरूप**

शेतातील प्रत्येक एक एकर क्षेत्रात उताराच्या दिशेने ५ फूट रुंद, ५ फूट लांब व ६ फूट खोल खड्डा खोदून त्यात खाली मोठे दगड, त्यावर मध्यम आकाराचे दगड भरून जलतारा तयार करण्यात येतो. एका जलतारामध्ये पावसाळ्यात सुमारे ३.६० लाख लिटर पाणी मुरविण्याची क्षमता आहे. त्यामुळे शिवारातील विहिरी व बोअरवेलला पाणी मिळण्यास मदत होऊन भूजलपातळी वाढीस चालना मिळणार आहे.



**आर्थिक सहाय्य**

मनरेगा अंतर्गत प्रत्येक जलतारासाठी ५ हजार २०० रुपये मजुरी स्वरूपात शेतकऱ्यास देण्यात येतात. सातबारा व उतारानुसार कमाल ५ एकरपर्यंत ५ जलतारे उभारण्याचा लाभ घेता येणार असून, एका शेतकऱ्यास २६ हजार रुपयांपर्यंत लाभ मिळू शकतो. यासाठी शेतकऱ्याने स्वतः काम करणे आवश्यक आहे. यासाठी शेतकऱ्यांनी ग्रामरोजगार सहाय्यक, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, कृषी सेवक, / तालुका समन्वयक, मनरेगा एपीओ, अभियंता, पंचायत समिती किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा- जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## पाणीफाऊंडेशन फार्मर कप स्पर्धा २०२६, नांदेड जिल्ह्यासाठी प्रेरणादायी निवासी प्रशिक्षण पर्व सगरोळी येथे संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड –** पाणी फाउंडेशन फार्मर कप स्पर्धा २०२६ अंतर्गत २ ते ४ फेब्रुवारी या कालावधीत तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्र (के.व्ही.के.), सगरोळी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मार्गदर्शन करताना शेतकरी हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.

बदलत्या काळात शेतीमध्ये ज्ञानाधिष्ठित, तंत्रस्नेही व वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून उत्पादनवाढ, खर्च नियंत्रण व उत्पन्नवाढीचे नवे मार्ग शोधावेत, असे प्रेरणादायी आवाहन त्यांनी केले.

हा कार्यक्रम नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी, मार्गदर्शक व परिवर्तनकारी ठरला. प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शेतकऱ्यांना दिलेली सदिच्छा भेट शेतकऱ्यांसाठी विशेष प्रेरणास्त्रोत ठरली.

या निवासी प्रशिक्षणासाठी नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील विविध गावांतून शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तीन दिवस चाललेल्या प्रशिक्षणात आधुनिक शेती तंत्रज्ञान, शाश्वत शेती पद्धती, गटशेती, मूल्यवर्धन, शेतीपूरक उद्योग, बाजारपेठ व्यवस्थापन तसेच शेतीतील नव्या संधी याबाबत सखोल व प्रात्यक्षिकाधारित मार्गदर्शन देण्यात आले. प्रशिक्षण काळात शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य, आत्मविश्वास आणि बदलाची सकारात्मक जाणीव स्पष्टपणे दिसून आली.

या कार्यक्रमास उपसंचालक आत्मा श्रीमती अर्चना गुंजकर, कृषी विज्ञान केंद्राचे चेअरमन प्रमोद देशमुख, पाणी फाउंडेशनचे महाराष्ट्र राज्य समन्वयक सत्यवान देशमुख, नांदेड विभागीय समन्वयक प्रविण काथवटे,श्री संदीप चव्हाण सर उमेद तालुका व्यवस्थापक कंधार तसेच अश्वमेध ग्रामीण पाणलोट क्षेत्र विकास व शैक्षणिक संस्था, कंधार येथील विविध विभागांचे अधिकारी, तज्ज्ञ मार्गदर्शक व मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या प्रशिक्षणातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची स्पष्ट दिशा, नव्या संधींची ओळख आणि शाश्वत शेतीचा मार्ग मिळाल्याचा अभिप्राय व्यक्त




करण्यात आला. प्रशिक्षणार्थींनी तीन दिवसांच्या अनुभवांबाबत समाधान व्यक्त करत भविष्यात आपल्या शेतीत सकारात्मक बदल घडवून आणण्याचा दृढ संकल्प व्यक्त केला. एकूणच फार्मर कप स्पर्धा २०२६ अंतर्गत आयोजित हा निवासी प्रशिक्षण कार्यक्रम नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरला असून शेतकऱ्यांच्या प्रगतीच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम घडवणारे पाऊल ठरले आहे.

# डॉ.समाधान दराडे यांना नांदेड विद्यापीठाची पीएचडी प्रदान

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड –** किनवट विधानसभेचे माजी आमदार, माजी महसूल राज्यमंत्री, माजी खासदार तसेच उत्तम संसदपटू म्हणून ओळखले जाणारे स्व. उत्तमरावजी राठोड यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्यावर प्रकाश टाकणारे संशोधन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे पूर्ण करण्यात आले आहे. हे संशोधन "स्व. उत्तमराव राठोड यांच्या राजकीय नेतृत्वाचा : एक चिकित्सक अभ्यास" या विषयावर संशोधक समाधान नारायणराव दराडे यांनी प्रबंध सादर केला होता. या संशोधनासाठी बळीराम पाटील मिशन, मांडवी संचलित श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, श्रीक्षेत्र माहूर येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. इकबाल खान यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. विशेष म्हणजे डॉ. खान यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यावाचस्पती प्राप्त करणारे ते पहिलेच संशोधक विद्यार्थी आहेत. डॉ .समाधान दराडे हे सध्या वसंतराव नाईक महाविद्यालय, वसरणी (जि. नांदेड) येथे राज्यशास्त्र विभागात तासिका तत्त्वावर कार्यरत आहेत. त्यांच्या या अभ्यासातून स्व. उत्तमराव राठोड यांच्या जनसेवेचा, शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा आणि राजकीय नेतृत्वाचा सखोल व चिकित्सक पद्धतीने आढावा घेण्यात आला आहे. याप्रसंगी डॉ. समाधान दराडे यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, "बळीराम पाटील मिशन मांडवीचे संस्थापक अध्यक्ष प्रफुल्लजी राठोड व सचिव सौ. संध्याताई राठोड यांच्या प्रेरणेने व सहकार्याने तसेच डॉ. इकबाल खान यांच्या मार्गदर्शनामुळे मी हे संशोधन वेळेत पूर्ण करू शकलो." या संशोधनामुळे स्व. उत्तमरावजी राठोड यांच्या कार्यकर्तृत्वाचे दस्तऐवजीकरण होऊन, त्यांच्या सामाजिक व राजकीय जीवनाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना मोठी दिशा मिळणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# डॉ.समाधान दराडे यांना नांदेड विद्यापीठाची पीएचडी प्रदान

**आत्ताच एक्सप्रेस**



**श्रीक्षेत्र माहूर –** किनवट विधानसभेचे माजी आमदार, माजी महसूल राज्यमंत्री, माजी खासदार तसेच उत्तम संसदपटू म्हणून ओळखले जाणारे स्व. उत्तमरावजी राठोड यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्यावर प्रकाश टाकणारे संशोधन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे पूर्ण करण्यात आले आहे.

हे संशोधन "स्व. उत्तमराव राठोड यांच्या राजकीय नेतृत्वाचा : एक चिकित्सक अभ्यास" या विषयावर संशोधक समाधान नारायणराव दराडे यांनी प्रबंध सादर केला होता. या संशोधनासाठी बळीराम पाटील मिशन, मांडवी संचलित श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, श्रीक्षेत्र माहूर येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. इकबाल खान यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. विशेष म्हणजे डॉ. खान यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यावाचस्पती प्राप्त करणारे ते पहिलेच संशोधक विद्यार्थी आहेत.

डॉ .समाधान दराडे हे सध्या वसंतराव नाईक महाविद्यालय, वसरणी (जि. नांदेड) येथे राज्यशास्त्र विभागात तासिका तत्त्वावर कार्यरत आहेत. त्यांच्या या अभ्यासातून स्व. उत्तमराव राठोड यांच्या जनसेवेचा, शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा आणि राजकीय नेतृत्वाचा सखोल व चिकित्सक पद्धतीने आढावा घेण्यात आला आहे.

याप्रसंगी डॉ. समाधान दराडे यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, "बळीराम पाटील मिशन मांडवीचे संस्थापक अध्यक्ष प्रफुल्लजी राठोड व सचिव सौ. संध्याताई राठोड यांच्या प्रेरणेने व सहकार्याने तसेच डॉ. इकबाल खान यांच्या मार्गदर्शनामुळे मी हे संशोधन वेळेत पूर्ण करू शकलो."

या संशोधनामुळे स्व. उत्तमरावजी राठोड यांच्या कार्यकर्तृत्वाचे दस्तऐवजीकरण होऊन, त्यांच्या सामाजिक व राजकीय जीवनाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना मोठी दिशा मिळणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# किनवटमध्ये दहा वर्षांची सेवायात्रा : पवार गुरुस्वामींच्या पुढाकाराने दरमहा मोफत आरोग्य शिबिरे

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट –** किनवट शहरात सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण करणारे पवार गुरुस्वामी गेल्या दहा वर्षांपासून अविरतपणे आरोग्यसेवा व मदतकार्य करत आहेत. त्यांच्या वतीने नर्मदेश्वर महादेव मंदिर साईबाबा संस्थान येथे दर महिन्याच्या पहिल्या गुरुवारी मोफत तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन केले जाते.

या उपक्रमात लॉयन्स नेत्र रुग्णालय जंगमवाडी, ओम साई डॉक्टर धर्मकारे यांचा दाताचा दवाखाना तसेच लॉयन्स स्पीच अँड हीयरिंग क्लिनिक यांचे मोलाचे सहकार्य लाभते. डोळ्यांची तपासणी, दातांचे उपचार, तसेच श्रवण-वाणी तपासणी अशा विविध सेवा या शिबिरांतून दिल्या जातात.

ग्रामीण व दुर्गम भागातील गरजू, गोरगरीब रुग्णांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवणे हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. नियमित शिबिरांमुळे अनेक रुग्णांना वेळेवर निदान व उपचार मिळून आरोग्यात सुधारणा झाली आहे.

आरोग्यसेवेपुरतेच न थांबता पवार गुरुस्वामी नित्य गरजूंसाठी अन्नसेवा, हिवाळ्यात ब्लँकेट वाटप, तसेच गरजवंतांना कपड्यांचे वितरण अशी मानवी संवेदनशीलतेची कामेही सातत्याने करत आहेत. त्यांच्या या निस्वार्थ सेवाभावामुळे किनवट परिसरात समाजसेवेचा दीप अखंड प्रज्वलित राहिला



आहे.

"ग्रामीण भागातील प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत सेवा पोहोचावी, हाच आमचा संकल्प आहे," असे मत आयोजक श्री पवार गुरुस्वामी यांच्याकडून व्यक्त करण्यात आले.

या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील नागरिकांनी दर महिन्याच्या पहिल्या गुरुवारी नर्मदेश्वर महादेव मंदिर साईबाबा संस्थान, किनवट येथे उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# माहूर येथील भोजंती तलाव जि. प. शाळेत विद्यार्थ्यावर माकडाचा जिवघेणा हल्ला

## माकडाच्या हल्ल्यात इ. तिसरीचा विद्यार्थी गंभीर जखमी ; शाळेच्या संरक्षण भिंतीसह विद्यार्थ्यास आर्थीक मदतीची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**श्रीक्षेत्र माहूर –** माहूर शहरातील भोजंती तलाव परिसरातील जिल्हा परिषदेच्या शाळेत दुपारच्या मध्यान्ह भोजनाच्या वेळेत परिसरात धुमाकूळ घालत असलेल्या माकडांनी जिवघेणा हल्ला चढविला असून या हल्ल्यात शाळेत इयत्ता तिसरीत शिक्षण घेणा-या विद्यार्थी गंभीर जखमी होवून त्यात त्याच्या हाताचे हाड फ्रॅक्चर झाल्याने संबंधित विद्यार्थ्याला तातडीच्या आर्थिक मदतीची मागणी होत आहे.

काल दि. ४ फेब्रुवारी रोजी माहूर येथील भोजती तलाव परिसरातील शिक्षण विभागाकडून अत्यंत दुर्लक्षित असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत दुपारी मध्यान्ह भोजनाच्या वेळी शाळेतील विद्यार्थी भोजन करीत असताना शाळेच्या प्रांगणात इयत्ता तिसरीतील हर्षद संदीप गावंडे वय ८ वर्षे या विद्यार्थ्यावर परिसरात उच्छाद मांडत असलेल्या माकडांनी जोरदार हल्ला चढविला.. यात उपद्रवी माकडांच्या जोरदार धक्क्याने जखमी विद्यार्थी हर्षदचा हात मोडला असून त्यात तो गंभीर जखमी झाल्याची घटना आज रोजी उघडकीस आल्याने शहरातील विविध शाळांत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.. या घटनेत गंभीर जखमी झालेला विद्यार्थी हा आर्थिकदृष्ट्या अत्यंत गरीब व वंचित कुटुंबातील असून उपचारांसाठी होणारा खर्च त्यांच्या कुटुंबासाठी मोठा भार ठरत आहे. तर घटनेच्या वेळी शाळेत उपस्थित असलेल्या इतर विद्यार्थ्यांतही प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले असून माकडांच्या सततच्या उपद्रवामुळे पालक आणि शिक्षक चिंतेत आहेत.

विशेष म्हणजे सदरची जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा ही अत्यंत असुरक्षित स्वरूपाची दिसून येत असून शाळेच्या परिसरात माकडांच्या प्रवेशापासून संरक्षणासाठी शाळेला संरक्षण भिंतच नसल्याने असे प्रकार सातत्याने घडत असल्याचे पालकवर्गातून सांगण्यात येत आहे... त्यामुळे सदर शाळेला शासनाने तातडीने संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याची मागणी पालकवर्गाकडून करण्यात आली असून संरक्षण भितीचे काम होईपर्यंत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी वनविभाग तसेच स्थानिक प्रशासनाकडून नियमित माकड पकडण्याची मोहीम



राबवावी.... सोबतच या घटनेत गंभीर झालेल्या विद्यार्थ्यास तातडीची आर्थिक मदत म्हणून शासनाकडून तात्काळ वैद्यकीय उपचार खर्च आणि आर्थिक मदत (अनुग्रह रक्कम) द्यावी. अशी मागणी पालकवर्गाकडून केली जात आहे.

# एस.एस.पाटील यांची बालभारती निवड

**आत्ताच एक्सप्रेस**



**माहूर –** तालुक्यातील नवी आबादी माहूर येथील जिल्हा परिषद शाळेचे उपक्रमशील शिक्षक शेषराव पाटील यांची महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे अर्थात बालभारतीवर समीक्षण सत्रासाठी निवड झाली आहे.

बालभारतीचे विशेष विषाधिकारी (भाषा) श्रीमती सविता वायाळ यांनी पत्रकाद्वारे याबाबत कळविले आहे. शालेय शिक्षण अभ्यासक्रम (प्रस्तावित) २०२५ वर प्रथम मराठी बालभारती इयत्ता सहावी पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीचे काम पाठ्यपुस्तक मंडळाने हाती घेतले आहे. या पाठ्यपुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यासाठी स्थापित झालेल्या समीक्षण समितीवर एस.एस. पाटील यांची निवड झाली आहे. निवडीबद्दल शिक्षणाधिकारी प्राथमिक वंदना फुटाणे, शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर, शिक्षणाधिकारी योजना दिलीपकुमार बनसोडे, गटशिक्षणाधिकारी संतोष शेटकार , गटशिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने, बाबुराव माडगे, उत्तम कानिंदे, मिलिंद कंधारे, बालभारती सदस्य रमेश मुनेश्वर, मिलिंद जाधव, मुख्याध्यापक संजीव वाठोरे, भाग्यवान भवरे, रणजीत वर्मा, मुख्याध्यापिका ललिता जोशी, फॅन्सी नखाते, लियाकत अली,जमीर शेख, सयद मुजीब आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813